महाराष्ट्र शासन
कृषी माहिती विभाग, कृषी आयुक्तालय
साखर संकुल, दुसरा मजला, शिवाजीनगर, पुणे
दूरध्वनी क्रमांक ०२०-२५५१००४९, ई मेल – ddinfor@gmail.com

**अन्नधान्य, कडधान्य, गळीतधान्य**
**पिकस्पर्धा मार्गदर्शक सूचना सन २०२६-२७**

जा.क्र./वि.प्र.४/पीकस्पर्धा/मा.सू./ र-१९१/२०२६
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
दिनांक - ०५/ ०६ /२०२६

**प्रति,**

१. **विभागीय कृषि सहसंचालक, (सर्व)**
२. **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, (सर्व)**
३. **तालुका कृषि अधिकारी, (सर्व)**

**विषय :- अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांच्या राज्यांतर्गत पिकस्पर्धेच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करणेबाबत...**

**संदर्भ** - १.शासन निर्णय क्रमांक:-पीक स्पर्धा -२०२२/प्र.क्र.११३/४ अे, दिनांक -२० जुलै, २०२३.
२. मार्गदर्शक सूचना जा.क्र./वि.प्र.४/पीकस्पर्धा/मा.सू./ र- ९४ /२०२५ कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे , दिनांक - ०४/ ०७ /२०२५

राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांची इच्छाशक्ती मनोबल यांमध्ये वाढ होऊन आणखी उमेदीने नवनवीन अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषि उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परिसरातील इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेऊन राज्यांतर्गत पिकस्पर्धा योजना राबविण्यात येत आहे.

सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी तालुकास्तरावरील पिकस्पर्धेमध्ये सहभाग घेऊन शेतकऱ्यांची आलेली उत्पादकता आधारभूत धरून राज्य, जिल्हा व तालुका स्तरावरील स्पर्धेसाठी विजेत्या शेतकऱ्यांची निवड करण्यात येणार आहे.

राज्यामध्ये अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांच्या क्षेत्रात आणि उत्पादनात वाढ होणे आवश्यक आहे हि बाब विचारात घेऊन जास्तीत जास्त शेतकरी पिकस्पर्धेत सहभागी होतील याची सर्वांनी दक्षता घ्यावी.

**१.पिकस्पर्धेतील पीके**: या स्पर्धेमध्ये खालील पिकांचा समावेश आहे.

**१.१ खरीप पीके:-** भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमुग, सुर्यफुल (एकूण ११ पिके)

**१.२ रब्बी पीके:-** ज्वारी, गहू, हरभरा, करडई, जवस (एकूण ०५ पिके)

**२. पिकस्पर्धेमध्ये सहभाग घेण्यासाठी पात्रता निकष:-**

२.१ स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावावर जमीन असणे व ती जमीन तो स्वत: कसत असणे आवश्यक आहे.

**२.२ कृषी विभागातील कार्यरत कर्मचारी व अधिकारी पिक स्पर्धेमध्ये सहभाग घेण्यासाठी पात्र ठरणार नाहीत.**

२.३ स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकांसाठी स्पर्धेत सहभाग घेता येईल.

२.४ पिकस्पर्धेमध्ये सहभाग घेण्याकरता स्पर्धकास स्वतःच्या शेतावर स्पर्धेकरिता सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या पिकाची भात पिकाच्या बाबतीत किमान २० आर व इतर पिकांच्या बाबतीत ४० आर (१ एकर) क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे.

२.५ भात पिकाच्या बाबतीत ज्या स्पर्धक शेतकऱ्यांचे पिकस्पर्धेसाठी निवड केलेले क्षेत्र २० आर ते ४० आर (१ एकर) पर्यंत असेल ते संपूर्ण क्षेत्र पिकस्पर्धेसाठी ग्राह्य धरले जाईल.

२.६ इतर सर्व पिकांचे बाबतीत सलग ४० आर (१ एकर) पेक्षा जास्त क्षेत्र असल्यास स्पर्धक शेतकऱ्यांकडे पुढील दोन पर्याय असतील.

अ) स्पर्धेच्या सुरुवातीस संपूर्ण क्षेत्रापैकी १ एकर क्षेत्र पिकस्पर्धेसाठी निश्चित करून देऊ शकतात. किंवा

ब) संपूर्ण क्षेत्र पिकस्पर्धेसाठी घोषित करू शकतात.

मात्र यासाठी अर्जासोबत पिकस्पर्धेसाठी घोषीत क्षेत्र नकाशावर चिन्हांकित करून जोडणे आवश्यक राहील.

संबंधित कृषी सहायक यांनी स्पर्धेपूर्वी याबाबतची पूर्वकल्पना स्पर्धक शेतकऱ्यांना देणे आवश्यक आहे.

२.७ पीकस्पर्धेसाठी जेवढे अर्ज प्राप्त होतील ते सर्व शेतकरी पीकस्पर्धेकरता पात्र राहतील. स्पर्धेत सहभागी होणारा शेतकरी तालुका, जिल्हा व राज्य पातळीवरील बक्षिसासाठी पात्र असल्याने तालुक्यामधून पिकस्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी किमान अर्ज संख्येची अट ठेवण्यात आली नाही.

२.८ मुद्दा क्र. २.७ नुसार किमान अर्ज संख्येची अट काढून टाकली असली तरी तालुक्यात लागवड असलेल्या व पिकस्पर्धेमध्ये समाविष्ठ असलेल्या सर्व पिकांचे पिकस्पर्धेकरीता पिकनिहाय किमान ५ अर्ज येतील याची जबाबदारी तालुका कृषी अधिकारी यांची राहील.

२.९ याकरीता प्रत्येक कृषि पर्यवेक्षक व संबंधित कृषि सहायक यांना पिकस्पर्धेत निवडलेल्या पिकांच्या निमित्ताने हंगामानुसार पिकवाढीच्या समस्या लक्षात याव्यात, प्रत्यक्ष उत्पादन पद्धतीचा अभ्यास करता यावा तसेच पिकस्पर्धेत सहभागी शेतकऱ्यांची संख्या वाढावी या दृष्टीने उपविभागीय कृषि अधिकारी यांनी पिकस्पर्धेमध्ये समाविष्ठ असलेल्या पिकांपैकी त्या तालुक्यात लागवड होत असलेली पिके यांचा अंदाज घेवून प्रत्येक तालुक्यातील कृषि पर्यवेक्षक सजानिहाय पिकस्पर्धेतील स्पर्धकांचे किमान लक्षांक देण्यात यावे. तसेच पिकस्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्लॉटवर पिक वाढीच्या अवस्थेनुसार कृषि पर्यवेक्षक व कृषि सहायक यांच्या भेटीचे लक्षांक देण्यात यावेत. संबंधित कृषि पर्यवेक्षक/कृषि सहायक यांनी कार्यक्षेत्रातील सर्व प्लॉटचे संनियंत्रण करणे बंधनकारक आहे. उपविभागीय कृषि अधिकारी यांनी किमान एका प्लॉटला भेट देणे अपेक्षित आहे.

२.१० लक्षांकापेक्षा कमी अर्ज असल्यास त्याची कारणे व त्याबाबतची केलेल्या प्रचार प्रसिद्धी आणि प्रयत्नांबाबतचा सविस्तर अहवाल ता.कृ.अ. यांनी उपविभागीय कृषी अधिकारी यांचेकडे सादर करावा. संबंधित उपविभागीय कृषी अधिकारी यांनी त्याची शहानिशा करून आवश्यक कार्यवाही करावी. याबाबत कार्यवाही होत आहे याच्या सनियंत्रणाची जबाबदारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांची राहील.

२.११ पिकस्पर्धेमध्ये राज्यस्तरावर प्रथम क्रमांक मिळवलेल्या शेतकऱ्याला पुढील पाच वर्ष त्याच पिकाकरिता पिकस्पर्धेत सहभाग घेता येणार नाही.

२.१२ पिकस्पर्धेमध्ये राज्य ते तालुका स्तरावरील विजेत्या स्पर्धकास ज्या पिकासाठी, ज्या क्रमांकाचे बक्षीस मिळाले आहे त्या स्तरावरील त्या क्रमांकाच्या खालचा स्तर व क्रमांकाकरिता स्पर्धकास त्याच पिकासाठी पुढील पाच वर्ष स्पर्धक म्हणून बक्षीसासाठी ग्राह्य धरले जाणार नाही तथापि विजेता स्तरावरील त्या क्रमांकाच्या वरील स्तर व

क्रमांकाकरिता स्पर्धक स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन बक्षीसासाठी पात्र राहील. मात्र इतर पिकांकरिता तो स्पर्धेत सहभाग घेऊ शकतो.

२.१३ उदा. जर एखाद्या शेतकऱ्याने खरीप २०२३ मध्ये सोयाबीन पिकामध्ये जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक मिळविला असेल तर पुढील पाच वर्ष त्या शेतकऱ्याला त्या पिकासाठी जिल्हास्तर द्वितीय, तृतीय क्रमांक व तालुकास्तर बक्षिसासाठी ग्राह्य धरले जाणार नाही. मात्र तो शेतकरी त्या पिकासाठी जिल्हास्तर प्रथम क्रमांक व राज्यस्तरावरील बक्षीसासाठी पात्र राहील.

२.१४ त्या अनुषंगाने प्रत्येक स्तरावर दरवर्षी तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या विजेत्या शेतकऱ्यांची माहिती जतन करून ठेवणे अनिवार्य आहे. सदर माहिती जतन करून ठेवणेसाठी प्रपत्र ऊ मध्ये नोंदवहीचा नमुना देण्यात आला आहे.

२.१५ नोंदवहीची पडताळणी करून स्पर्धक शेतकरी स्पर्धेस पात्र आहे याची तपासणी करण्याची जबाबदारी संबंधित तालुका कृषि अधिकारी यांची राहील.

**३.पिकस्पर्धा जाहीर करणे:-** खरीप व रब्बी हंगामापूर्वी संपूर्ण राज्यामध्ये आयुक्त (कृषी) हे स्पर्धा जाहीर करतील व त्यास प्रसिद्धी देतील. तद्नंतर सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी त्याची आपले स्तरावरून व्यापक प्रचार प्रसिद्धी करावी. त्यामध्ये आकाशवाणी, दुरदर्शन, स्थानिक वृत्तपत्रे, क्षेत्रीय कार्यक्रम, पोस्टर्स, विविध समाजमाध्यमे इत्यादी प्रसिध्दी माध्यमांव्दारे मोठ्या प्रमाणावर प्रसिध्दी देऊन विविध पिकांच्या पिकस्पर्धांमध्ये सहभाग घेण्यास शेतकऱ्यांना प्रवृत्त करावे. व त्याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे.

**४. अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे: -**

पिकस्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांनी खालील कागदपत्रांची पूर्तता संबंधीत तालुका कृषि अधिकाऱ्यांकडे करावयाची आहे.

१) विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र-अ)

२) ठरवून दिलेले प्रवेश शुल्क भरल्याचे चलन

३) ७/१२, ८-अ चा उतारा

४) जात प्रमाणपत्र (केवळ आदिवासी असल्यास)

५) पिकस्पर्धेसाठी शेतकऱ्याने संबंधित ७/१२ वरील घोषित केलेल्या क्षेत्राचा चिन्हांकित केलेला नकाशा

६) बँक खाते चेक/पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत

**४.१** अर्ज करणाऱ्या स्पर्धक शेतकऱ्यास अर्ज करतेवेळी प्रपत्र ब-१ ची प्रत उपलब्ध करून देणे तसेच त्यामध्ये भरावयाच्या माहितीबाबत मार्गदर्शन करणे व पिक कापणीवेळेस माहिती भरलेले प्रपत्र-ब-१ शेतकऱ्याकडून ताब्यात घेणे हे तालुका कृषि अधिकारी यांना बंधनकारक आहे. प्रपत्र-ब-१ मधील मुदा क्र.१४ काढणी व मळणीचा तपशील व खर्च याबाबतची माहिती संपूर्ण क्षेत्राची कापणी पूर्ण झाल्यानंतर संबंधित तालुका कृषी अधिकारी यांनी शेतकऱ्याकडून घेऊन प्रपत्र-ब-१ मध्ये नोंदवावी.

**५. अर्ज दाखल करण्याची अंतीम तारीख:**

निरनिराळ्या हंगामामध्ये पिकस्पर्धेसाठी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख खालील प्रमाणे राहिल.

**५.१ खरीप हंगाम:**

- मूग व उडीद पिक:- ३१ जुलै
- भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, सोयाबीन, भुईमुग व सुर्यफुल:- ३१ ऑगस्ट

**५.२ रब्बी हंगाम:**

- ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस:- ३१ डिसेंबर

५.३ अर्ज दाखल करण्याच्या अंतिम तारखेच्या दिवशी शासकीय सुट्टी असल्यास त्यापुढील शासकीय सुट्टी नसलेली तारीख गृहीत धरण्यात यावी.

५.४ अर्ज मागविण्याची मुदत संपल्यानंतर तालुका कृषी अधिकारी यांनी पिकस्पर्धेकरीता सहभागी शेतकऱ्यांची पिकनिहाय माहिती जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालयाला **प्रपत्र- क** मध्ये पाठवावी.

५.५ जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी पिकस्पर्धेकरीता सहभागी शेतकऱ्यांची पिकनिहाय व तालुकानिहाय माहिती विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयाला **प्रपत्र- क** मध्ये पाठवावी.

५.६ विभागीय कृषि सहसंचालक यांनी पिकस्पर्धेकरीता सहभागी शेतकऱ्यांची पिकनिहाय व जिल्हानिहाय माहिती अधिनस्त कार्यालयांकडून प्राप्त करून घेऊन एकत्रित **प्रपत्र-क** मध्ये कृषि आयुक्तालयास सादर करावी. मात्र त्यामधील तालुका हा स्तंभ वगळण्यात यावा.

**६. स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क :**

६.१ पीकनिहाय (प्रत्येक पिकासाठी स्वतंत्र) सर्वसाधारण गटासाठी रक्कम रु.३०० व आदिवासी गटासाठी रक्कम रु. १५० राहिल.

६.२ सहभागी शेतकऱ्यांनी प्रवेश शुल्क स्वतः खालील लेखा शिर्षामधे शासकीय कोषागारात विहीत मुदतीत जमा करावे.

| मराठी | इंग्रजी |
|---|---|
| ०४०१- पीक संवर्धन<br>१०४- शेती क्षेत्रांपासून प्राप्त जमा रकमा<br>(००)(०२) -पीकस्पर्धा योजनेखालील जमा रकमा<br>०४०१०४७३०१ | 0401- Crop Husbandry<br>104 - Receipts from Agricultural Farms<br>(00)(02) - Receipts under crop competition scheme<br>0401047301 |

पिकस्पर्धा चलनाची रक्कम वर नमूद केलेल्या लेखाशिर्षावरच जमा केली जाईल याची जबाबदारी ता.कृ.अ. यांची राहील. वर नमूद केलेल्या लेखाशीर्ष व्यतिरिक्त इतर कोणत्याही लेखाशिर्षावर शुल्क जमा होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

**६.३ ऑनलाईन पद्धतीने प्रवेश शुल्क चलन भरण्याची कार्यपद्धती:-**

१) ऑनलाईन पद्धतीने रक्कम भरणा करण्यासाठी gras.mahakosh.gov.in या वेबसाईट वर जावे.

२) त्यानंतर मुख्य पृष्ठावरील pay without Registratioon पर्याय निवडावा.

३) वरील पर्याय निवडल्यानंतर Select Department हे पृष्ठ येईल मात्र त्यामध्ये पर्याय न निवडता त्या पृष्ठावरील शेवटचा Skip selection and go to normal page of payment हा पर्याय निवडावा.

४) त्यानंतर येणाऱ्या पृष्ठावरील Department, Payment type, District, Taluka, Office name, Scheme name, Period Year, Amount, शेतकऱ्याचे नाव, पत्ता, मोबाईल नंबर याबाबतची माहिती खालीलप्रमाणे भरावी.

- **Department** - commissionarate of agriculture. **Payment type**- crop husbandry.
- **District** - आपल्या जिल्ह्याचे नाव भरावे. **Taluka**- आपल्या तालुक्याचे नाव भरावे.
- **Office name** - ता.कृ.अ. कार्यालयाचे नाव भरावे. पर्यायांमध्ये संबंधित ता.कृ.अ. कार्यालयाचे नाव नसल्यास उपलब्ध पर्यायामधील कृषि विभागाच्या कार्यालयाचे नाव भरावे. व कृषि विभागाचे कार्यालय नसेल तर तालुक्यातील इतर विभागाचे कार्यालय पर्यायांमध्ये उपलब्ध असेल ते निवडावे. (उदा.- BDO कार्यालय)
- **Scheme name** - Receipts under crop competition Scheme

- Period year- स्पर्धेचे वर्ष भरून half yearly हा पर्याय निवडावा.
  त्यामध्ये खरीप हंगामासाठी April-Sept व रब्बी हंगामासाठी Oct-March हा पर्याय निवडावा.
- Subscription fees - सर्वसाधारण गटासाठी रु.३०० व आदिवासी गटासाठी रु. १५० यानुसार रक्कम भरावी.
- **शेतकऱ्याचे नाव** - **पत्ता** - **पिन कोड** - **मोबाईल नंबर** - याप्रमाणे माहिती भरावी.

५) वरील संपूर्ण माहिती भरल्यानंतर Payment करण्यासाठी पुढीलप्रमाणे पर्याय देण्यात येतील.

- Internet Banking - हा पर्याय निवडण्यासाठी आपले राष्ट्रीयीकृत बँकेत Internet Banking Account असणे आवश्यक आहे.
- Payment Across Bank Counter (Cash/cheque) - हा पर्याय निवडल्यावर Bank Details भरावेत व Submit बटन क्लिक करावे. चलन Draft Generate झाल्यानंतर Proceed बटन क्लिक करावे. त्यानंतर चलनाचा Draft तपासून घ्यावा. बरोबर असल्यास Ok बटन क्लिक करावे. चूक असल्यास Cancle बटन क्लिक करावे. अशाप्रकारे System Generated चलन प्राप्त होईल. हे चलन बँकेत जमा करून प्रवेश शुल्क रक्कम भरणा करावा.
- Payment Gateway (Internet Banking, Debit Card, Credit Card, UPI) - पेमेंट गेटवेद्वारे दिलेल्या कोणत्याही खाजगी किंवा सहकारी बँकेत तुमचे इंटरनेट बँकिंग खाते असल्यास हा पर्याय वापरा. जर तुम्हाला Payment Debit/Credit Card वापरायचे असल्यास देखील हा पर्याय निवडावा.
- UPI Payment - आपण UPI पद्धतीने Payment करू शकता.

६) वरीलपैकी कोणताही एक payment mode निवडल्यानंतर Image text टाकून Submit बटनावर क्लिक करावे.

**६.४** कृषि विभागाचे अधिकारी/कर्मचारी यांना सूचित करण्यात येते कि पिकस्पर्धेमध्ये सहभाग घेण्यास इच्छुक असणाऱ्या शेतकऱ्यांना चलन भरण्यासाठी उचित मार्गदर्शन व मदत करावी.

**६.५** पिकस्पर्धेत सहभागी झालेल्या शेतक-यास प्रवेश शुल्क परत दिले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**६.६** पीक स्पर्धेत भाग घेतलेल्या स्पर्धकाने स्पर्धेतून माघार घ्यावयाची झाल्यास कापणीपूर्वी १५ दिवस अगोदर माघार घेत असल्याचे तालुका कृषी अधिकारी कार्यालयास लेखी कळवावे. तसेच माघार कोणत्या कारणासाठी घेतली हे अर्जात सुस्पष्ट नमुद करावे मात्र प्रवेश शुल्क परत केले जाणार नाही.

**६.७** माघार घ्यावयाच्या अर्जाचा नमुना **(प्रपत्र- उ)** सोबत सहपत्रीत करण्यात येत आहे.

**७. स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्यांची/स्पर्धकांची जबाबदारी: -**

**७.१** स्पर्धक शेतकऱ्याने ज्या पिकाकरीता स्पर्धेमध्ये सहभाग घेतला आहे त्या अनुषंगाने पिक पेरणी ते काढणी पर्यंतची सर्व माहिती **प्रपत्र-ब-१** मध्ये भरून पिक कापणीच्या वेळेस कापणी समितीच्या सचिवाकडे जमा करणे बंधनकारक राहील.

**७.२** स्पर्धक शेतकऱ्याने पिक कापणीच्या किमान १५ दिवस अगोदर तालुका कृषी अधिकारी यांना पिक कापणीची तारीख कळवणे बंधनकारक राहील.

**७.३** पिक कापणीच्या दिवशी कापणी व मळणीच्या अनुषंगाने सर्व तयारी करून ठेवण्याची जबाबदारी व त्याकरिता आवश्यक खर्चाची जबाबदारी स्पर्धकाची राहील.उदा. कापणीसाठी मजूर बोलावणे, मळणीसाठी मशीन बोलावणे, वजनकाटा,ताडपत्री इ. उपलब्ध करून ठेवणे.

**७.४** पिक कापणी समितीस सर्व आवश्यक ते सहकार्य करणे.

## ८. पिक कापणी समिती

**अ) पीक कापणी करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात आली आहे.**

| | | |
|---|---|---|
| १ | उ.वि.कृ.अ यांनी आदेशित केलेले तं.अ./असंबंधित ता.कृ.अ./ मं.कृ.अ./कृ.अ. | अध्यक्ष |
| २ | संबंधित कृषी अधिकारी (पंचायत समिती ) | सदस्य |
| ३ | संबंधित मंडळ कृषी अधिकारी | सदस्य |
| ४ | संबंधित गावचे सरपंच किंवा सरपंचाने प्राधिकृत केलेला ग्रा.पं. सदस्य | सदस्य |
| ५ | ग्राम कृषी विकास समिती सदस्य | सदस्य |
| ६ | कृषी पर्यवेक्षक | सदस्य |
| ७ | संबंधित कृषी सहाय्यक/सेवक | सदस्य सचिव |

(**टिप**-जर एखाद्या उपविभागात पिकस्पर्धेअंतर्गत होणाऱ्या पिक कापणीची संख्या जास्त असेल व एकाच दिवशी कापणी समिती अध्यक्षांना ३-४ कापणीला उपस्थित राहणे शक्य होत नसेल तर संबंधित उपविभागीय कृषि अधिकारी एका पेक्षा जास्त पिक कापणी समित्या स्थापन करू शकतात.)

**ब) पिक कापणी समितीची कार्ये: –**

१) पिक कापणी समितीतील सदस्यांनी पिक कापणी वेळी उपस्थित राहावे.

२) पिक कापणी व मळणी समितीच्या समक्ष करुन घेणे.

३) कापणी पूर्वी प्रपत्र-ब-१ मधील माहिती शेतकऱ्याकडून प्राप्त करून घेऊन तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे जमा करणे.

४) आलेल्या उत्पादकतेची आकडेवारी योग्य असल्याबाबत खात्री करणे व **प्रपत्र ब-२** मध्ये उत्पादकतेच्या आकडेवारीची नोंद घेणे.

५) पिक स्पर्धेतील पिकांची पिक कापणी झाल्यानंतर पिक कापणीची सर्व समिती सदस्यांच्या तसेच उपस्थित असल्यास प्रतिस्पर्धी शेतकऱ्यांच्या स्वाक्षरीची **प्रपत्र ब-२** मधील माहिती, प्रक्षेत्रावरील कापणीचे दोन फोटो (सॉफ्ट कॉपी व हार्डकॉपीमध्ये) तालुका कृषी अधिकारी कार्यालयास सादर करणे.

## ९. पीक कापणी प्रयोगासाठी प्लॉटची निवड व मोजमापे: –

| अ. क्र. | पिकाचे नाव | प्लॉटचे मोजमाप | कापणी करावयाचे एकूण क्षेत्र | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | क्षेत्र (आर) | कापणीचे एकूण क्षेत्र | क्षेत्राचे करावयाचे भाग (पिक कापणी प्लॉटची संख्या) |
| १) | भात | १० X १० मी. | २० आर | १ गुंठे | १ |
| | | | २०.०१ ते ४० आर | २ गुंठे | २ |
| | | | ४०.०१ आर व वरील | ३ गुंठे | ३ |
| २) | खरीप/रब्बी ज्वारी, बाजरी, मका, भुईमुग, सुर्यफुल, गहू, हरभरा, करडई,जवस | १० X १० मी. | ४० आर | २ गुंठे | २ |
| | | | ४०.०१ आर व वरील | ३ गुंठे | ३ |
| ३) | तूर | २० X १० मी | ४० आर | ४ गुंठे | २ |
| | | | ४०.०१ आर व वरील | ६ गुंठे | ३ |
| ४) | मूग, उडीद, सोयाबीन, नाचणी (रागी) | १० X ५ मी | ४० आर | १ गुंठे | २ |
| | | | ४०.०१ आर व वरील | १.५ गुंठे | ३ |

९.१ उपरोक्त प्रमाणे सांख्यिकी विभागाच्या धर्तीवर पिकस्पर्धेतील पिकांसाठी पिकनिहाय पिक कापणी प्लॉटची संख्या व प्लॉटची मोजमापे वरील तक्त्यात नमूद केल्यानुसार निश्चित करून दिली आहेत. पीक कापणी करावयाच्या एकूण क्षेत्रानुसार निश्चित केलेल्या प्लॉटची संख्या आणि त्याची उत्पादन आकडेवारी व्यवस्थित नोंदविलेली आहे

किंवा नाही याची फेरतपासणी/खातरजमा करुन मगच वरिष्ठ कार्यालयास बिनचुक व परिपुर्ण माहिती सादर करावी.

९.२ **पिक कापणी प्लॉटची संख्या निश्चित करणे:-** स्पर्धक शेतकऱ्याने स्पर्धेकरीता घोषित केलेल्या क्षेत्राच्या प्रमाणामध्ये पिक कापणी प्लॉटची संख्या वरील तक्त्यामध्ये नमूद केल्यानुसार निश्चित करावी.

९.३ जर भात पिकाच्या बाबतीत क्षेत्र २० आर असेल तर पिकस्पर्धा प्लॉटचे भाग करण्याची आवश्यकता नाही व त्या सलग क्षेत्रावर रॅन्डम पद्धतीचा वापर करून वरील तक्त्यामध्ये नमूद केल्यानुसार संबंधित पिकाकरीता दिलेल्या प्लॉटच्या मोजमापानुसार प्लॉटची निश्चिती करावी.

९.४ भात पिकाच्या बाबतीत क्षेत्र २०.०१ ते ४० आर यामध्ये असेल तर क्षेत्राचे अंदाजे दोन समान भाग करावेत व दोन्ही भागात स्वतंत्रपणे रॅन्डम पद्धतीचा वापर करून वरील तक्त्यामध्ये नमूद केल्यानुसार संबंधित पिकाकरीता दिलेल्या प्लॉटच्या मोजमापानुसार प्लॉटची निश्चिती करावी.

९.५ इतर सर्व पिकांच्या बाबतीत क्षेत्र ४० आर असेल तर क्षेत्राचे अंदाजे दोन समान भाग करावेत व दोन्ही भागात स्वतंत्रपणे रॅन्डम पद्धतीचा वापर करून वरील तक्त्यामध्ये नमूद केल्यानुसार संबंधित पिकाकरीता दिलेल्या प्लॉटच्या मोजमापानुसार प्लॉटची निश्चिती करावी.

९.६ भात व इतर सर्व पिकांच्या बाबतीत ४०.०१ आर व त्यावरील क्षेत्र असेल तर क्षेत्राचे अंदाजे तीन समान भाग करावेत व तीनही भागात स्वतंत्रपणे रॅन्डम पद्धतीचा वापर करून वरील तक्त्यामध्ये नमूद केल्यानुसार संबंधित पिकाकरीता दिलेल्या प्लॉटच्या मोजमापानुसार प्लॉटची निश्चिती करावी.

९.७ वरीलप्रमाणे क्षेत्राचे भाग केल्यानंतर सांख्यिकी विभागाच्या तक्त्यानुसार प्रत्येक भागासाठी स्वतंत्र रॅन्डम नंबर लावून पिक कापणी प्लॉटची निश्चिती करावी. उदा.-(भात पिक)

- जर एखाद्या शेतकऱ्याचे भात पिकाचे क्षेत्र २० आर असेल तर क्षेत्राचे भाग न पाडता पूर्ण क्षेत्राकरीता रॅन्डम नंबर लावून पिक कापणी प्लॉट निश्चित करून १० X १० मी (१ गुंठा) क्षेत्राची कापणी करावी.
- परंतु क्षेत्र जर २०.०१ ते ४० आर यामध्ये असेल तर त्या क्षेत्राचे अंदाजे २ समान भाग करावेत. पिक कापणी प्लॉटची निश्चिती करण्यासाठी पहिल्या भागाला जो रॅन्डम नंबर वापरला जाईल त्याच्या पुढचा रॅन्डम नंबर दुसऱ्या प्लॉटला वापरावा. व दोन्ही भागात स्वतंत्रपणे १० X १० मी (१ गुंठा) असे एकूण २ गुंठे क्षेत्राची कापणी करावी.
- ४०.०१ आर व त्यावरील क्षेत्र असल्यास त्या क्षेत्राचे अंदाजे ३ समान भाग करावेत. पहिल्या भागाला जो रॅन्डम नंबर वापरला जाईल त्याच्या पुढचा रॅन्डम नंबर दुसऱ्या प्लॉटला वापरावा व दुसऱ्या प्लॉटला जो रॅन्डम नंबर वापरला जाईल त्याच्या पुढचा रॅन्डम नंबर तिसऱ्या प्लॉटसाठी वापरून पिक कापणी प्लॉटची निश्चिती करावी. व तीनही भागात स्वतंत्रपणे १० X १० मी (१ गुंठा) असे एकूण ३ गुंठे क्षेत्राची कापणी करावी.

९.८ उपरोक्त तक्त्यात नमूद केल्यानुसार सांख्यिकी विभागाच्या धर्तीवर पिकस्पर्धेतील पिकांसाठी पिक कापणी प्लॉटची मोजमापे निश्चित करून दिली आहेत. सांख्यिकीच्या मार्गदर्शक सूचनेनुसार निवड केलेल्या शेतात कापणीकरीता निश्चित केलेल्या आकारानुसार क्षेत्र उपलब्ध नसल्यास ते शेत वगळले जाते. परंतु पिकस्पर्धेसाठी निवडलेल्या क्षेत्रावर कापणी घेणे अनिवार्य असल्याने ज्या ठिकाणी क्षेत्राची लांबी/रुंदी कमी अथवा पुरेशी नसल्यास प्लॉटच्या मोजमापानुसार कापणी करणे शक्य होत नसेल तर अशा अपवादात्मक परिस्थितीत क्षेत्रीय परिस्थितीनुसार पिक कापणी समिती पिक कापणी प्लॉटच्या मोजमापामध्ये बदल करू शकते. परंतु कापणीचे एकूण क्षेत्र बदलता येणार नाही.

उदा.जर एखाद्या स्पर्धकाची हरभरा पिकासाठी कापणी प्लॉटचे मोजमाप १० X १० मी. असून एकूण १ गुंठा (१०० चौ.मी.) क्षेत्राची कापणी करावयाची आहे. परंतु रुंदी कमी असल्यामुळे १० X १० मी. चा प्लॉट निश्चित करणे शक्य

नसेल तर १२ X ८.४ किंवा अशाप्रकारे एकूण १ गुंठा (१०० चौ.मी.) क्षेत्र होईल असे प्लॉटचे मोजमाप निश्चित करावे.

**१०.पीक कापणी बाबतच्या सूचना: -**

**१०.१** पिकस्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या व कापणीस इच्छुक असलेल्या सर्व स्पर्धकांची पिक कापणी करणे अनिवार्य आहे.

**१०.२** पिकस्पर्धा अधिक पारदर्शकपणे होण्यासाठी तालुका कृषि अधिकारी यांनी तालुक्यातील पिकनिहाय सहभागी सर्व स्पर्धक शेतकऱ्यांना इतर स्पर्धक शेतकऱ्यांच्या पिक कापणीची तारीख कळविणे बंधनकारक आहे. स्पर्धक शेतकऱ्यांनी इतर स्पर्धक शेतकऱ्यांच्या पिक कापणीस उपस्थित राहणे ऐच्छिक आहे.

**१०.३** पिकस्पर्धा प्लॉटची कापणी व मळणी एकाच दिवशी पिक कापणी समितीच्या समक्ष करण्यात यावी.

**१०.४** पिक कापणी व मळणी झाल्यानंतर आलेल्या उत्पादकेतेची आकडेवारी कळविताना सांख्यिकी विभागाच्या सूचनेनुसार सुकवणी गुणोत्तर (Driage Ratio) असल्यास त्याचा वापर करून अंतिम उत्पादकतेची आकडेवारी निश्चित करावी. पिकनिहाय व जिल्हानिहाय सुकवणी गुणोत्तर (Driage Ratio) बाबतची माहिती सोबत देण्यात येत आहे.

**१०.५** ज्या पिकांच्या बाबतीत सुकवणी गुणोत्तर उपलब्ध नाही अशा पिकांच्या बाबतीत पिक कापणीवेळी आलेले उत्पादन ग्राह्य धरण्यात यावे.

**१०.६** तसेच भात पिकाच्या बाबतीत साळीचे रुपांतर तांदळामध्ये करण्यासाठी ०.६९ गुणक वापरून तांदुळामध्ये प्रति हेक्टरी अंतिम उत्पादकता निश्चित करावी.

उदा. भात पिकाच्या बाबतीत ठाणे जिल्ह्यातील एखाद्या स्पर्धक शेतकऱ्याचे पिक कापणी नुसार साळीचे उत्पादन ९० क्विंटल/हे. इतके असेल तर प्रथम त्यास ०.९३८९ सुकवणी गुणोत्तर (Driage Ratio) लावावे. ९० X ०.९३८९=८४.५०१ क्विंटल/हे. साळीचे उत्पादन येईल. त्यानंतर साळीचे रुपांतर तांदळामध्ये करण्यासाठी ०.६९ गुणक वापरावे. ८४.५०१ क्विंटल/हे. X ०.६९ = ५८.३० क्विंटल/हे. हे तांदळामधील अंतिम उत्पादन ग्राह्य धरण्यात यावे.

**१०.७** पिकस्पर्धेमध्ये समाविष्ट असलेल्या पिकांची कापणी, मळणी व अंतिम उत्पादनाचे आकडे घेण्यासाठी पिकानुसार काही वेगवेगळ्या पद्धती असल्याने सर्वसाधारण कापणी, मळणी व उत्पादनाची आकडेवारी निश्चित करणेसाठी खालीलप्रमाणे सूचना राहतील.

१) पिकस्पर्धा प्लॉटमधील पिक कापणीस पूर्णपणे तयार झाल्यानंतरच कापणी करावी.

२) **भात, गहू, मूग, उडीद, हरभरा,तूर,सोयाबीन, करडई व जवस** या पिकांची काढणी झाल्यानंतर त्याच्या पेंढ्या बांधून, एकत्र करून पेंढयांचे वजन कि.ग्रॅ. मध्ये घ्यावे. त्यानंतर कापणीच्याच दिवशी मोगरीने/मशीनने पिकाची झोडपणी/मळणी करावी व उफणनी करून धान्य साफ करावे. उफणनी झाल्यानंतर मिळालेल्या धान्याचे वजन करावे.

३) **खरीप/रब्बी ज्वारी, बाजरी, नाचणी, मका** या पिकांच्या बाबतीत प्लॉटमधील पिकाची कापणी झाल्यानंतर कणसे खुडून एकत्र करून मळणी करावयाच्या अगोदर कणसांचे वजन कि.ग्रॅ मध्ये घ्यावे. त्यानंतर कापणीच्याच दिवशी मोगरीने/मशीनने कणसांची झोडपणी/मळणी करावी व उफणनी करून धान्य साफ करावे. उफणनी झाल्यानंतर मिळालेल्या धान्याचे वजन करावे.

४) ज्वारी व मका पिकाचा वापर प्रामुख्याने जनावरांच्या कडब्यासाठी होत असल्याने कडब्याचे वजन देखील नोंदवावे. मका पिकाच्या बाबतीत कापणी करण्यापूर्वी मक्याचे दाणे पूर्ण वाळलेले व सहजरित्या मळणी करून वेगळे करता येईल अशा अवस्थेत असावेत.

५) **भुईमूग** पिकाच्या बाबतीत प्लॉटमधील पिकाची काढणी झाल्यावर शेंगांचे वेलीसह वजन कि.ग्रॅ. मध्ये घ्यावे. त्यानंतर शेंगा वेलीपासून वेगळ्या कराव्यात. शेंगांवरील माती काढून शेंगा व्यवस्थित स्वच्छ कराव्यात. भुईमुगाच्या बाबतीत ओल्या शेंगांचे वजन करावे लागेल व त्या वजनास भुईमूग पिकासाठी निश्चित केलेले सुकवणी गुणोत्तर (Driage Ratio) लावून आलेले वजन नोंदवावे. थोडक्यात भुईमुग पिकाच्या बाबतीत उत्पादन हे शेंगाचे राहील शेंगदाण्याचे नाही याची नोंद घ्यावी.

६) **सूर्यफूल** पिकाच्या बाबतीत प्लॉटमधील पिकाची कापणी झाल्यानंतर सूर्यफुलाची फुले काढून एकत्र करून मळणी करावयाच्या अगोदर फुलांचे वजन कि.ग्रॅ मध्ये घ्यावे. त्यानंतर कापणीच्याच दिवशी मोगरीने/मशीनने फुलांची झोडपणी/मळणी करावी व उफणनी करून सूर्यफुलाच्या बिया साफ कराव्यात. उफणनी झाल्यानंतर मिळालेल्या बियांचे वजन करावे.

१०.८ पिकस्पर्धेतील पिकांच्या पिक कापणी नंतर आलेल्या उत्पादनाची मोजणी करण्यासाठी वापरावयाचे वजनकाटे आधुनिक व अचूक मोजमाप दाखवणारे असावेत.

**११.पीक कापणी प्रयोगाचे पर्यवेक्षण -**

१) उपविभागीय कृषी अधिकारी यांनी आपल्या अधिनस्त कार्यक्षेत्रातील किमान १० स्पर्धकांच्या पिकस्पर्धेतील पिकांच्या पिक कापणीस उपस्थित राहावे.

२) जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी आपल्या अधिनस्त कार्यक्षेत्रातील किमान ३ स्पर्धकांच्या पिकस्पर्धेतील पिकांच्या पिक कापणीस उपस्थित राहावे.

३) विभागीय कृषी सहसंचालक यांनी आपल्या अधिनस्त कार्यक्षेत्रातील किमान २ स्पर्धकांच्या पिकस्पर्धेतील पिकांच्या पिक कापणीस उपस्थित राहावे.

**१२.पिकस्पर्धा निकाल घोषित करणेसाठी खालीलप्रमाणे तालुका, जिल्हा, व राज्य स्तरावर पीकस्पर्धा निकाल समित्या स्थापन केल्या आहेत.**

**अ) तालुकास्तर पीकस्पर्धा निकाल समिती -**

| | | |
|---|---|---|
| १ | संबंधित तालुका कृषि अधिकारी | अध्यक्ष |
| २ | तालुक्यातील सर्व मंडळ कृषि अधिकारी | सदस्य |
| ३ | तालुका कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि अधिकारी | सदस्य सचिव |

**ब) जिल्हास्तर पीकस्पर्धा निकाल समिती-**

| | | |
|---|---|---|
| १ | संबंधित जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी | अध्यक्ष |
| २ | संबंधित कृषि विकास अधिकारी | सदस्य |
| ३ | सर्व उपविभागीय कृषि अधिकारी | सदस्य |
| ४ | संबंधित जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि उपसंचालक | सदस्य सचिव |

**क) राज्यस्तर पीकस्पर्धा निकाल समिती-**

| | | |
|---|---|---|
| १ | मा. आयुक्त, (कृषि) | अध्यक्ष |
| २ | कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे | सदस्य |
| ३ | कृषि सहसंचालक (वि.प्र.-१ ) कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे | सदस्य |
| ४ | कृषि सहसंचालक (वि.प्र. २ ) कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे | सदस्य |
| ५ | कृषि सहसंचालक (वि.प्र. ३ ) कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे | सदस्य |
| ६ | मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे | सदस्य |
| ७ | कृषि उपसंचालक (माहिती ) कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे | सदस्य सचिव |

- पीकस्पर्धेबद्दल अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार या समितीला आहे व हा निर्णय सर्व सहभागी स्पर्धकांना बंधनकारक राहील.

**१३. पीकस्पर्धेचा निकाल –**

**१३.१** ज्या शेतक-याची स्पर्धेत भाग घेतलेल्या पीकाची उत्पादकता तालुक्याच्या त्या पीकाच्या सरासरी उत्पादकतेच्या (त्या पीकाची मागील ५ वर्षाची सरासरी उत्पादकता ) दिडपट किंवा त्यापेक्षा अधिक आहे अशा शेतकऱ्यांना पिकस्पर्धेतील पुरस्कारासाठी पात्र समजण्यात यावे. त्यापेक्षा कमी उत्पादकता असणारे शेतकरी पिकस्पर्धा पुरस्कारासाठी अपात्र समजण्यात येतील.

**१३.२** ज्या पीकाच्या सरासरी उत्पादकतेची तालुकास्तरावर अधिकृत माहिती उपलब्ध नसेल अशा ठिकाणी जिल्ह्याच्या सरासरी उत्पादकतेची (त्या पीकाची मागील ५ वर्षाची सरासरी उत्पादकता) आकडेवारी ग्राहय धरावी. जिल्हयाच्या सरासरी उत्पादकतेची आकडेवारी उपलब्ध नसल्यास राज्याच्या त्या पिकाच्या सरासरी उत्पादकतेची (त्या पीकाची मागील ५ वर्षाची सरासरी उत्पादकता) आकडेवारी ग्राह्य धरण्यात यावी. या उत्पादकतेच्या दीडपट किंवा त्याहून अधिक उत्पादकता असणारे शेतकरी पीकस्पर्धा पुरस्कारासाठी पात्र समजण्यात येतील. त्यापेक्षा कमी उत्पादकता असणारे शेतकरी पुरस्कारासाठी अपात्र समजण्यात येतील.

**१३.३** पिकस्पर्धेअंतर्गत पिक कापणी व्हावयाच्या किमान संख्येची अट नसल्याने तालुक्यात जितक्या स्पर्धक शेतकऱ्यांची पिक कापणी झाली असेल व त्यापैकी जे शेतकरी मुद्दा क्र. १३.१ व १३.२ नुसार उत्पादकतेच्या अटीची पूर्तता करत असतील तर ते शेतकरी (१ शेतकरी असेल तरीही) पिकस्पर्धेतील बक्षिसासाठी दावेदार समजण्यात येतील. व त्यांची माहिती वरिष्ठ कार्यालयास पाठविणे ता.कृ.अ. यांच्यावर बंधनकारक आहे.

**१३.४ दोन स्पर्धक** शेतकऱ्यांचे एकसारखे उत्पादन आले असल्यास –

- दोन स्पर्धक शेतकऱ्यांचे एकसारखे उत्पादन आल्यास प्रपत्र ब मधील उत्पादन खर्चाची तपासणी करावी. ज्या स्पर्धक शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी त्याचा प्रथम व ज्या शेतकऱ्याचा उत्पादन खर्च जास्त त्याचा द्वितीय याप्रमाणे गुणानुक्रम ठरवावा.
- दोन स्पर्धक शेतकऱ्यांचे एकसारखे उत्पादन आल्यास ज्या शेतकऱ्यांनी कोरडवाहू शेतीमध्ये उत्पादन घेतले आहे. त्याला प्राधान्यक्रम प्रथम द्यावा.
- दोन स्पर्धक शेतकऱ्यांचे एकसारखे उत्पादन आल्यास दोन्हीपैकी कोणत्या शेतकऱ्याने विद्यापीठाच्या सुधारित जातीचा वापर केला आहे त्याला प्रथम प्राधान्य द्यावे

**१३.५** पीकस्पर्धेत तालुक्यातून सहभागी झालेल्या स्पर्धकांची पीक कापणी झाल्यानंतर पिक कापणी समितीने पिक कापणी बाबतची माहिती **प्रपत्र ब–१ व प्रपत्र ब–२** मध्ये तालुका कृषी अधिकारी यांचेकडे सादर करावी.

**१३.६** पिकस्पर्धेसाठी निश्चित केलेल्या प्लॉटचे तालुक्याच्या त्या पीकाच्या सरासरी उत्पादकतेच्या (त्या पीकाची मागील ५ वर्षाची सरासरी उत्पादकता) पाचपट किंवा त्यापेक्षा अधिक असल्यास संबंधित उपविभागीय कृषि अधिकारी यांनी संबंधित पीक कापणी समिती व संबंधित शेतकरी यांचेशी चर्चा करुन आलेल्या उत्पादकतेची शहानिशा आणि ताळेबंदाची तपासणी करावी. त्यानंतर संबंधित माहिती प्रमाणित करुन सादर करावी. प्रमाणपत्राचे प्रपत्र सोबत सहपत्रित करण्यात आले आहे.

**१३.७** तद्नंतर तालुकास्तर पीकस्पर्धा निकाल समितीने संयुक्त स्वाक्षरीने **प्रपत्र–ड** मध्ये पिकनिहाय प्राप्त पिक कापणीच्या आकडेवारीनुसार गुणानुक्रमांकाचा तपशील, सहभागी स्पर्धक संख्या, माघार घेतलेले स्पर्धक संख्या व प्रत्यक्ष पिक कापणी झालेले स्पर्धक संख्या याबाबतच्या माहितीचे तालुकास्तरावर संकलन करावे.

**१३.८** तालुकास्तर पीकस्पर्धा निकाल समितीने संयुक्त स्वाक्षरीने तालुकास्तरावर पीकनिहाय प्राप्त उत्पादकतेच्या आकडेवारीनुसार सर्वसाधारण व आदिवासी शेतकऱ्यांचे गुणानुक्रमे जास्तीत जास्त पहिल्या नऊ (९) शेतकऱ्यांची आकडेवारी ब-३ प्रपत्रातील उविभागीय कृषी अधिकारी यांचे प्रमाणपत्रासह संबंधित जिल्हा अधीक्षक कृषी

अधिकारी यांचेकडे खरीप पिक स्पर्धेच्या बाबतीत माहे १५ नोव्हेंबर व रब्बी पिकस्पर्धेच्या बाबतीत माहे ३० एप्रिल अखेर **प्रपत्र-इ** मध्ये सादर करावी.

**१३.९** जिल्हास्तर पीकस्पर्धा निकाल समितीने संयुक्त स्वाक्षरीने जिल्हास्तरावर तालुकास्तरावरुन पीकनिहाय प्राप्त उत्पादकतेच्या आकडेवारीनुसार सर्वसाधारण व आदिवासी शेतकऱ्यांचे गुणानुक्रमे जास्तीत जास्त पहिल्या सहा (६) शेतकऱ्यांची माहिती संबंधित विभागीय कृषी सहसंचालक यांचेकडे खरीप पिक स्पर्धेच्या बाबतीत ३० नोव्हेंबर व रब्बी पिकस्पर्धेच्या बाबतीत माहे १५ मे पर्यंत **प्रपत्र-इ-१** मध्ये सादर करावी.

**१३.१०** विभागीय कृषी सहसंचालक यांनी विभागस्तरावर जिल्हास्तरावरुन पीकनिहाय प्राप्त उत्पादकतेच्या आकडेवारीनुसार सर्वसाधारण व आदिवासी शेतकऱ्यांचे गुणानुक्रमे जास्तीत जास्त पहिल्या तीन (३) शेतकऱ्यांची माहिती कृषी उपसंचालक (माहिती) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे खरीप पिकस्पर्धेच्या बाबतीत माहे १५ डिसेंबर आणि रब्बी पिकस्पर्धेच्या बाबतीत ३१ मे पर्यंत **प्रपत्र-इ-२** मध्ये सादर करावी.

**१३.११** राज्यस्तरीय पिकस्पर्धा निकाल समितीने विभाग स्तरावरून प्राप्त स्पर्धकांच्या उत्पादकतेच्या माहितीच्या आधारे राज्यस्तरावरून पिकस्पर्धेचा पिकनिहाय सर्वसाधारण व आदिवासी गटाकरिता निकाल घोषित करावा. राज्यस्तरीय पिकस्पर्धेचा निकाल प्रथम घोषित करण्यात यावा.

**१३.१२** राज्यस्तरावरील निकाल घोषित झाल्यानंतर राज्यस्तरावरील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पिकस्पर्धा विजेते वगळून जिल्हास्तरीय पिकस्पर्धा निकाल समितीने संबंधित जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रातील स्पर्धकांमधून जिल्हास्तरावरील पिकनिहाय सर्वसाधारण व आदिवासी गटाकरिता प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पिकस्पर्धा विजेत्यांची निवड करुन निकाल घोषित करावेत व सदर निकाल जिल्हास्तरीय पिकस्पर्धा निकाल समितीच्या संयुक्त स्वाक्षरीने कृषी आयुक्तालयास सादर करावेत.

**१३.१३** राज्य आणि जिल्हास्तरावरील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पिकस्पर्धा विजेते वगळून तालुकास्तरीय पिकस्पर्धा निकाल समितीने संयुक्त स्वाक्षरीने संबंधित तालुक्याच्या कार्यक्षेत्रातील स्पर्धकांमधून पिकनिहाय सर्वसाधारण व आदिवासी गटाकरिता तालुकास्तरावरील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पिकस्पर्धा विजेत्यांची निवड करुन निकाल घोषित करावेत.

**१३.१४** राज्य, जिल्हा व तालुकास्तरावरील निकाल घोषित करताना दोन शेतकऱ्यांचे उत्पादन समान येत असेल तर निकाल समितीने प्रपत्र ब-२ चे अवलोकन करावे व ज्या शेतकऱ्याचा उत्पादन खर्च कमी असेल, जमीन आरोग्य पत्रिकेनुसार खतांचा वापर करत असेल, संतुलित पद्धतीने निविष्ठांचा वापर, एकात्मिक पद्धतीने कीड नियंत्रण करत असेल अशा स्पर्धक शेतकऱ्यास प्राधान्य द्यावे. व त्यानुसार प्राधान्यक्रम निश्चित करून निकाल घोषित करावा परंतु कोणत्याही परिस्थितीत बक्षीस विभागून देता येणार नाही.

**१३.१५** जिल्हा व तालुकास्तर विजेत्या शेतकऱ्यांच्या बक्षीस रकमेची मागणी – जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी जिल्हा व तालुकास्तर निकाल तसेच जिल्हा व तालुकास्तर विजेत्या शेतकऱ्यांसाठी आवश्यक एकूण बक्षीस रक्कम याबाबतची माहिती **प्रपत्र-प** मध्ये विभागीय कृषि सहसंचालक यांच्या मार्फत कृषी आयुक्तालयास सादर करावी.

**१४. पिकस्पर्धा विजेते - बक्षिसाचे स्वरूप व वितरण**

| अ.क्र | स्पर्धा पातळी | सर्वसाधारण व आदिवासी गट बक्षिस रुपये | | |
|---|---|---|---|---|
| | | पहिले | दुसरे | तिसरे |
| १ | तालुका पातळी | ५,००० | ३,००० | २,००० |
| २ | जिल्हा पातळी | १०,००० | ७,००० | ५,००० |
| ३ | राज्य पातळी | ५०,००० | ४०,००० | ३०,००० |

१) खरीप व रब्बी हंगामातील राज्यस्तरीय पिकस्पर्धा विजेते शेतकऱ्यांना सन्मानपूर्वक बक्षीस वितरण राज्यस्तरावर करण्यात येईल.

२) जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी चालू वर्षातील खरीप हंगाम व मागील वर्षातील रब्बी हंगामातील जिल्हा व तालुका पातळीवरील पिकस्पर्धा विजेत्या स्पर्धक शेतकऱ्यांना माहे जानेवारी ते मार्च या कालावधीत जिल्हास्तरावर विशेष कार्यक्रमाचे आयोजन करून सन्मानपूर्वक बक्षीस वितरण करावे. यासाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी जिल्ह्यातील चालू वर्षातील खरीप हंगाम व मागील वर्षातील रब्बी हंगामातील जिल्हा व तालुका पातळीवर विजेत्या शेतकऱ्यांच्या संख्येच्या प्रमाणात बक्षीस समारंभासाठी लागणाऱ्या निधीची मागणी आयुक्तालयास **प्रपत्र-फ** मध्ये करावी. सदर निधी खर्च करण्याचे अधिकार जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना देण्यात येत आहेत.

३) **जिल्हा व तालुकास्तरीय विजेत्यांना द्यावयाच्या प्रशस्तीपत्रकाचा नमुना सोबत जोडला आहे.** त्या नमुन्यानुसार प्रशास्तीपत्रक देण्यात यावेत.

पिकस्पर्धा राबविणेबाबतची सर्व जबाबदारी संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेवर व संनियंत्रणाची जबाबदारी विभागीय कृषि सहसंचालक यांची राहील. पिकस्पर्धा योजनेस आकाशवाणी, दुरदर्शन, स्थानिक वृत्तपत्रे,विविध समाजमाध्यमे इत्यादी प्रसिध्दी माध्यमाव्दारे मोठ्या प्रमाणावर प्रसिध्दी देऊन विविध पिकस्पर्धामध्ये भाग घेण्यास शेतकऱ्यांना प्रवृत्त करावे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन पिकांचे उत्पादन वाढीची निकोप स्पर्धा या माध्यमातून राज्यभर मोठ्या प्रमाणात निर्माण होईल आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढीमध्ये मोठे योगदान राहील, याबाबत खबरदारी घ्यावी.

**सोबत – वरीलप्रमाणे सहपत्रे**

(र.आ. नाईकवाडी)
कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत-**

१. मा.प्रधान सचिव, कृषि, कृषि विभाग मंत्रालय, मुंबई, यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा.कृलगुरु, महात्मा फुले कृषी विद्यापीठ ,राहुरी यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा.कृलगुरु,डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांना माहितीस्तव सविनय सादर.
४. मा.कृलगुरु,वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांना माहितीस्तव सविनय सादर.
५. मा.कृलगुरु,डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
६. मा.आयुक्त (पशुसंवर्धन)महाराष्ट्र राज्य, यांना माहितीस्तव सविनय सादर.
७. मा. संचालक ,महाराष्ट्र राज्य कृषि शिक्षण व संशोधन परिषद यांना माहितीस्तव सविनय सादर.
८. मा.जिल्हाधिकारी (सर्व) यांना माहितीस्तव सविनय सादर.
९. प्रकल्प संचालक, आत्मा (सर्व) यांना माहितीस्तव अग्रेषित.
१०. कृषि विकास अधिकारी (सर्व) यांना माहितीस्तव अग्रेषित.
११. कृषि उपसंचालक,मा.आयुक्त, कृषि कक्ष यांना माहितीस्तव.

**प्रपत्र-अ**

**पीकस्पर्धेकरीता अर्जाचा नमुना**

**(तृणधान्य, कडधान्य, गळीतधान्य पिकस्पर्धा) सर्वसाधारण गट/आदिवासी गट**

**दिनांक -**

**प्रति,**

**तालुका कृषि अधिकारी, ,जिल्हा-**

मी, श्री. -------------------------------------------मोबाईल नंबर----------------------

राहणार-------------------पोस्ट-------------------तालुका------------जिल्हा-----------

खाली नमुद तपशिलानुसार---------हंगाम, सन-------- यावर्षीच्या पिकस्पर्धेत भाग घेऊ इच्छितो.

प्रवर्ग :- सर्वसाधारण गट- ☐ आदिवासी गट- ☐

१) पिकाचे नाव:-

२) यापूर्वी या पिकासाठी पिकस्पर्धेत सहभाग घेऊन बक्षीस मिळवले असल्यास त्याबाबतचा तपशील -

अ)स्पर्धेचा स्तर ------------- ब)वर्ष व हंगाम --------------- क) क्रमांक -----------

३) अ)पिकाचा वाण:- ब) उत्पादक/वितरक कंपनीचे नाव-

४) पेरणी/लागवड दिनांक:-

५) ८-अ नुसार धारण केलेले एकूण क्षेत्र - ------------------हे.

६) ७/१२ पैकी स्पर्धकाचे स्वतःचे हिश्यानुसार प्लॉटचे एकुण क्षेत्र - ----------------हे.

७) मार्गदर्शक सुचनेमधील मुद्दा क्र.२.५ नुसार पिकस्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी घोषित केलेले क्षेत्र ------- हे.

८)स्पर्धेसाठी घोषित केलेल्या क्षेत्राचा चिन्हांकित केलेला नकाशा अर्जासोबत जोडला आहे का ? होय/नाही

९) बागायत आहे किंवा जिरायत:

१०) जमिनीचा प्रकार:-

११) प्रवेश फी भरलेली रक्कम:-

१२) चलन पावती क्रमांक व दिनांक:-

१३) बँक खाते तपशिल :- बँकेचे नाव व शाखा:-

खाते क्रंमांक :- आय.एफ.सी.कोड:-

१४) आधार कार्ड क्रमांक :-

१५) जात प्रवर्ग (आदिवासी असल्यास):-

मी स्वतः शेती करत असून, शेती हे माझे मुख्य उत्पन्नाचे स्रोत आहे. पिकस्पर्धेतील सर्व नियम व अटी मला बंधनकारक आहेत व त्या मला मान्य आहेत. मी पीक कापणीच्या वेळी आवश्यक ते सर्व सहकार्य देण्यास तयार आहे. उपरोक्त नमूद सर्व माहिती योग्य आहे. यातील माहिती अयोग्य ठरल्यास मी उचित कार्यवाहीस पात्र राहील याची मला कल्पना आहे.अर्जासोबत मी खालील कागदपत्रे जोडली आहेत.

१) विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र-अ) ☐ २) ठरवून दिलेले प्रवेश शुल्क भरल्याचे चलन ☐

३) ७/१२, ८-अ चा उतारा ☐ ४) जात प्रमाणपत्र (केवळ आदिवासी असल्यास) ☐

५) पिकस्पर्धेसाठी शेतकऱ्याने संबंधित ७/१२ वरील घोषित केलेल्या क्षेत्राचा चिन्हांकित केलेला नकाशा ☐

६) बँक खाते चेक/पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकीत प्रत ☐

**स्पर्धकाची सही**

**नाव -**

संपर्क **क्र.** -

## प्रपत्र-ब-१

## (तृणधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकस्पर्धा) सर्वसाधारण गट/आदिवासी गट

## स्पर्धकाचा पिक लागवड व खर्चाचा तपशील

पिकाचे नाव----------------------

१) स्पर्धकाचे नाव (संपूर्ण) ---------------------------------------------------------------

२) पूर्ण पत्ता: गाव------------------------पोस्ट--------------- तालुका-------------------

जिल्हा-------------------  मोबाईल नंबर ----------------

३)स्पर्धेसाठी निवड केलेल्या पिकाचे एकूण क्षेत्र ---------हे.

(टिप-घोषित क्षेत्रापेक्षा त्या प्लॉटमध्ये अतिरिक्त क्षेत्र असल्यास त्याचाही समावेश माहिती भरण्यासाठी करावा)

४) जमिनीचा प्रकार -

**५)जमिनीच्या पूर्व मशागतीची कामे -**

| अ.क्र. | पूर्वमशागतीच्या कामाचे स्वरूप | कामाचा दिनांक | आलेला खर्च (रुपये) | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मजुरी | अवजार भाडे | एकूण | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| **एकूण खर्च** | | | | | | |

**६) खतांचा वापर याबाबत तपशील -**

| अ. क्र. | खताचे नाव | वापराचा तपशिल | | | आलेला खर्च | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रमाण (Quantity) | पिक वाढीची अवस्था व वापराचा दिनांक | उत्पादक कंपनीचे नाव | वापरलेल्या खतांची किंमत | मजुरी/ यंत्र | एकूण |
| १ | हिरवळीची खते<br>१)<br>२) | | | | | | |
| २ | सेंद्रिय खते<br>१)<br>२)<br>३) | | | | | | |
| ३ | रासायनिक खते<br>१)<br>२)<br>३) | | | | | | |
| **एकूण खर्च** | | | | | | | |

**७) बियाणे वाणाचा तपशील -**

अ) वाणाचे नाव------------------  ब)वाणाची कंपनी -------------------------

क) वापरलेला बियाणे दर ------------किलो/हे.  ड)वापरलेले एकूण बियाणे ----------------किलो

इ)बियाणे खरेदी करता आलेला खर्च-----------रु.

८)बिजप्रक्रिया केली आहे/नाही.  केल्यास तपशील द्यावा.

| अ. क्र. | बिजप्रक्रियेसाठी वापरलेल्या उत्पादनाची माहिती | वापराबाबत तपशील | | आलेला खर्च | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रमाण प्रति किलो बियाणे | एकूण वापर | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| एकूण खर्च | | | | | |

९) पेरणीचा तपशील

अ)पेरणीची अथवा रोपे लावणीची तारीख -------------- ब)पेरणीची पद्धत ------------------

क) दोन ओळीतील अंतर ------------(सें.मी.) व दोन रोपातील अंतर - ------------(सें.मी.)

ड) पेरणीच्या कामाकरीता आलेला खर्च -

i)मजुरीचा खर्च ----------- रु. + ii) यंत्रांच्या भाड्याचा खर्च --------------- रु.

पेरणीच्या कामाकरीता आलेला एकूण खर्च (i +ii) = ---------------रु.

१०)अ)सिंचनाची पद्धत (पारंपारिक/ठिबक/तुषार सिंचन) - ----------------

ब)पिक वाढीच्या कोणत्या अवस्थेत पाणी दिले याचा तपशील-

| अ.क्र. | वाढीची अवस्था | दिनांक |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

११) आंतरमशागतीचा तपशील -

| अ.क्र. | आंतरमशागतीचे काम (खुरपणी,कोळपणी व इ) | काम केल्याचा दिनांक | मजुरीवर झालेला खर्च रु. |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| एकूण खर्च | | | |

१२) पिक वाढीच्या काळात किड-रोग नियंत्रणासाठी केलेल्या उपाययोजना -

| अ. क्र. | किड रोगाचे नाव | केलेल्या उपाययोजना प्रतिबंधात्मक/ जैविक/ रासायनिक | उपचाराचा तपशील | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | नाव | वापरलेली मात्र | आलेला खर्च | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| एकूण खर्च | | | | | | |

१३)तण नियंत्रणाचा तपशील

| अ.क्र. | तणाचे नाव | वापरलेले तणनाशक | मात्रा | आलेला खर्च | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | तणनाशकाची किंमत | मजुरीवरील खर्च | एकूण खर्च |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| एकूण खर्च | | | | | | |

१४)काढणी व मळणीचा तपशील -

| अ.क्र. | काढणीची पद्धत (मशीन /मजूर) | मशीनला लागलेले तास /मजुरांची संख्या | मजुरीचा दर किंवा मशीन/मळणी यंत्राच्या भाड्याचा दर | आलेला एकूण खर्च (रुपये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

(टिप - याबाबत आलेल्या खर्चाची माहिती ता.कृ.अ. यांनी स्पर्धक शेतकऱ्याकडून प्राप्त करून घेऊन सदर प्रपत्रात भरावी.)

१५) प्लॉटचे क्षेत्र-------साठी पिकाच्या उत्पादनासाठी आलेला एकूण खर्च - -------------------रु.

१६) त्यानुसार प्रति हेक्टरी आलेला खर्च - --------------------- रु.

स्पर्धक शेतकऱ्याची सही

नाव -

## प्रपत्र ब -२

## पिक कापणीचा तपशिल

## (तृणधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकस्पर्धा) सर्वसाधारण गट / आदिवासी गट

पिकाचे नाव ---------------- पिकाचे वाण - --------------

१) स्पर्धेकाचे नांव (संपूर्ण ------------------------------------------------------------------

२) पूर्ण पत्ता : गाव------------ पोस्ट---------तालुका----------------जिल्हा--------------------

संपर्क क्र.- --------------

३) स्पर्धेसाठी घोषित केलेल्या प्लॉटचे क्षेत्र ---------हे. ४) पिक कापणीची तारीख - -----------------

| अ. क्र. | कापणीचा तपशील | | पिक कापणी प्लॉटनुसार माहिती | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | प्लॉट नं. १ | प्लॉट नं. २ | प्लॉट नं. ३ |
| १ | प्लॉट निश्चित करण्यासाठी वापरलेला रॅन्डम नंबर | लांबी साठी | | | |
| | | रुंदी साठी | | | |
| २ | कापणी केलेल्या प्लॉटचे मोजमाप (---X ---मी.) | | | | |
| ३ | कापणी प्लॉट मधील मळणीसाठी कापलेल्या पिकाचे एकूण वजन (कि.ग्रॅ.) | | | | |
| ४ | निव्वळ भुइयाचे वजन (कि.ग्रॅ.) | | | | |
| ५ | कापणी प्लॉटचे आलेले एकूण धान्य उत्पादन /भुईमुगाच्या बाबतीत शेंगा उत्पादन (कि.ग्रॅ.) | | | | |
| ६ | वापरलेला DRIAGE Ratio | | | | |
| ७ | DRIAGE Ratio लावून आलेले अंतिम धान्य उत्पादन /भुईमुगाच्या बाबतीत अंतिम शेंगा उत्पादन (कि.ग्रॅ.) | | | | |
| ८ | भात पिकाच्या बाबतीत साळीचे तांदळामध्ये रुपांतर करून आलेले अंतिम उत्पादन (कि.ग्रॅ.) (०.६९ गुणक वापरावे) | | | | |
| ९ | सर्व प्लॉटचे सरासरी धान्य उत्पादन/भुईमुगाच्या बाबतीत शेंगा उत्पादन (कि.ग्रॅ.) | | | | |
| १० | **हेक्टरमध्ये रुपांतरीत करून आलेले धान्याचे अंतिम उत्पादन /भुईमुगाच्या बाबतीत शेंगांचे अंतिम उत्पादन (क्विं./हे.)** | | | | |
| ११ | कडब्याच्या बाबतीत हेक्टरमध्ये रुपांतरीत करून आलेले उत्पादन (क्विं./हे.) | | | | |

(मुद्दा क्र.३ मध्ये ज्वारी,बाजरी, नाचणी, मका या पिकांच्या बाबतीत कडबा व कणसासह/ भात, गहू, मूग, उडीद, हरभरा, तूर, सोयाबीन, करडई व जवस पिकांच्या बाबतीत पेंढयांचे/भुईमुगाच्या बाबतीत वेलीसह शेंगांचे व सूर्यफुलाच्या बाबतीत फुलांचे वजन ग्राह्य धरावे.)

वरीलप्रमाणे पिक कापणी आमच्या समक्ष करण्यात आलेली असून नमूद केलेली माहिती योग्य आहे.

| | | |
|---|---|---|
| सही -<br>नाव व पदनाम :-<br>**अध्यक्ष तथा पर्यवेक्षण अधिकारी** | सही -<br>नाव :-<br>**संबंधित मंडळ कृषी अधिकारी** | सही -<br>नाव :-<br>**सरपंच किंवा सरपंचाने प्राधिकृत केलेला ग्रा.पं. सदस्य** |
| सही -<br>नाव :-<br>**ग्राम कृषी विकास समिती सदस्य** | सही -<br>नाव :-<br>**संबंधित कृ.अ.(पंचायत समिती)** | सही -<br>नाव :-<br>**कृषि पर्यवेक्षक** |
| सही -<br>नाव :-<br>**कृषि सहाय्यक/सेवक** | सही -<br>नाव :-<br>**स्पर्धक शेतकरी** | सही -<br>नाव :-<br>**उपस्थित असल्यास प्रतिस्पर्धी शेतकरी** |

## प्रपत्र-क

## (तृणधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकस्पर्धा) सर्वसाधारण गट/आदिवासी गट

पिकस्पर्धेतील सहभागी स्पर्धक संख्या तपशील (पिककापणीपुर्वी)

| अ.क्र. | पिकाचे नाव | विभाग | जिल्हा | तालुका | सहभागी स्पर्धक संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |
| | | | | | | |

**स्वाक्षरी/-**
तालुका कृषि अधिकारी/
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी/
विभागीय कृषि सहसंचालक

## प्रपत्र- ड

## (तृणधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकस्पर्धा) सर्वसाधारण गट/आदिवासी गट

तालुकास्तरावर पिकनिहाय पिककापणीनुसार आलेल्या उत्पादनाच्या गुणानुक्रमाचा तपशील

- सहभागी स्पर्धक संख्या -
- माघार घेतलेले स्पर्धक संख्या -
- प्रत्यक्ष पिक कापणी झालेले स्पर्धक संख्या -

| अ.क्र. | पिकाचे नाव | शेतक-याचे नाव | गाव | तालुका | जिल्हा | विभाग | आलेले उत्पादन (क्विं./हेक्टर) | गुणानुक्रम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

(टीप - हि माहिती ता.कृ.अ. कार्यालयाकडे जतन करून ठेवावी.)

**स्वाक्षरी/-**
तालुका कृषि अधिकारी

**प्रपत्र - इ**

**(तृणधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकस्पर्धा) सर्वसाधारण गट/आदिवासी गट**

पिकस्पर्धेतील पीकनिहाय प्राप्त उत्पादकतेच्या आकडेवारीनुसार **पहिल्या नऊ** शेतकऱ्यांचे गुणपत्रक

| गुणानुक्रमांक | पिकाचे नाव | शेतक-याचे नाव | गाव | तालुका | आलेले प्रति हेक्टर उत्पादन (क्विं./हे.) (प्रपत्र-ब-२ मधील मुद्दा क्र.११ ची आकडेवारी ) |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |
| ६ | | | | | |
| ७ | | | | | |
| ८ | | | | | |
| ९ | | | | | |

**स्वाक्षरी/-**

तालुकास्तरीय पिकस्पर्धा निकाल समिती

**प्रपत्र - इ - १**

**(तृणधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकस्पर्धा) सर्वसाधारण गट / आदिवासी गट**

पिकस्पर्धेतील पीकनिहाय प्राप्त उत्पादकतेच्या आकडेवारीनुसार **पहिल्या सहा** शेतकऱ्यांचे गुणपत्रक

| गुणानुक्रमांक | पिकाचे नाव | शेतक-याचे नाव | गाव | तालुका | जिल्हा | आलेले प्रति हेक्टर उत्पादन(क्विं./हे.) (प्रपत्र-ब-२ मधील मुद्दा क्र.११ ची आकडेवारी ) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |
| ६ | | | | | | |

**स्वाक्षरी/-**

जिल्हास्तरीय पिकस्पर्धा निकाल समिती

**प्रपत्र - इ - २**

**(तृणधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकस्पर्धा) सर्वसाधारण गट / आदिवासी गट**

पिकस्पर्धेतील पीकनिहाय प्राप्त उत्पादकतेच्या आकडेवारीनुसार **पहिल्या तीन** शेतकऱ्यांचे गुणपत्रक

| गुणानु क्रमांक | पिकाचे नाव | शेतक-याचे नाव | गाव | तालुका | जिल्हा | विभाग | आलेले प्रति हेक्टर उत्पादन (क्विं./हे.) (प्रपत्र-ब-२ मधील मुद्दा क्र.११ ची आकडेवारी ) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |

**स्वाक्षरी/-**

विभागीय कृषि सहसंचालक, ----------

प्रपत्र-उ

<u>राज्यांतर्गत पीकस्पर्धेतून माघार घ्यावयाचा अर्जाचा नमुना</u>

(तृणधान्य, कडधान्य, गळीतधान्य पिकस्पर्धा) सर्वसाधारण गट / आदिवासी गट

दिनांक -

**प्रति,**

**तालुका कृषि अधिकारी,------------------जिल्हा-**

मी, श्री. ---------------------------------------------मोबाईल नंबर---------------------- राहणार----------------------- पोस्ट-------------तालुका------------जिल्हा------------------------------- या पिकासाठी ----------या वर्षी ------------हंगामासाठी पिकस्पर्धेमध्ये भाग घेतला होता. परंतु ------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

या कारणास्तव, मी -----------पिकाच्या पिकस्पर्धेमधून स्वेच्छेने माघार घेत आहे.

**स्पर्धकाची सही**

**नाव -**

**संपर्क क्र. -**

**प्रपत्र ऊ**

**नोंदवहीचा नमुना**

विजेत्या शेतकऱ्यांची नोंद ठेवण्यासाठी तालुकास्तरावर, जिल्हास्तरावर व राज्यस्तरावर नोंदवही ठेवण्यात यावी. कार्यालय प्रमुखांकडून सदर नोंदवही प्रमाणित करून घेण्यात यावी. राज्य, जिल्हा व तालुका स्तरावर खाली दिलेल्या रकान्यांमधील माहिती भरून नोंदवही जतन करून ठेवण्यात यावी. तालुकास्तरावरील नोंदवहीमध्ये तालुक्यातील राज्य, जिल्हा व तालुकास्तर विजेत्या शेतकऱ्यांची माहिती जतन करून ठेवावी. जिल्हास्तरावरील नोंदवहीमध्ये राज्य व जिल्हास्तर विजेत्या शेतकऱ्यांची माहिती जतन करून ठेवावी. राज्यस्तरावर राज्यस्तरीय विजेत्या शेतकऱ्यांची माहिती जतन करून ठेवावी.

| अ. क्र. | स्पर्धेचा हंगाम व वर्ष | पिकाचे नाव | विजेत्या शेतकऱ्याचे नाव | पत्ता | संपर्क क्र. | आलेले उत्पादन क्विं./हे. | विजेता स्तर (तालुका/जिल्हा/ राज्य) | विजेता क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

प्रपत्र- प

(तृणधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकस्पर्धा) (सर्वसाधारण गट / आदिवासी गट)

जिल्हा व तालुकास्तर पिकस्पर्धा निकाल व आवश्यक बक्षीस रक्कम याबाबतच्या माहितीचा तपशील

| अ. क्र. | स्पर्धेचा स्तर जिल्हा/ तालुका | पिकाचे नाव | प्रवर्ग | गुणानु- क्रमांक | शेतकऱ्याचे नाव | पत्ता व संपर्क क्र. | आलेले उत्पादन (क्विं/हे) | आवश्यक बक्षीस रक्कम (रुपयामध्ये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| जिल्ह्यासाठी आवश्यक एकूण जिल्हास्तर व तालुकास्तर बक्षीस रक्कम | | | | | | | | |

**प्रपत्र- फ**

**(तृणधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकस्पर्धा) (सर्वसाधारण गट / आदिवासी गट)**

**बक्षीस वितरण समारंभासाठी आवश्यक निधी मागणीचा तपशील**

**प्रति,**

**मा. कृषी संचालक ( विस्तार व प्रशिक्षण )**

**कृषी आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे**

**विषय** :- राज्यांतर्गत पिकस्पर्धा योजना सन.............. अंतर्गत खरीप /रब्बी हंगामामध्ये घेण्यात आलेल्या पिकस्पर्धांमध्ये जिल्हास्तर व तालुकास्तरावरील विजेते शेतकऱ्यांचा सन्मान कार्यक्रम आयोजन करणेसाठी निधी मागणी करणेबाबत....

संदर्भ :- कृषी आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सूचना जा.क्र./कृ.मा.वि./वि.प्र-४/ /२०२५दि. / /२०२५

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार पिकस्पर्धा खरीप----- /रब्बी----- हंगामामध्ये आयोजित झालेल्या पिकस्पर्धेमध्ये जिल्हा व तालुकास्तरावरील विजेते स्पर्धकांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

**खरीप व रब्बी हंगामातील एकूण विजेते संख्या -**

| अ.क्र. | हंगाम व वर्ष | पिकस्पर्धेचा स्तर | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | जिल्हास्तर | तालुकास्तर | |
| १ | खरीप | | | |
| २ | रब्बी | | | |
| एकूण | | | | |

तरी वरीलप्रमाणे एकूण ----- स्पर्धकांना जिल्हास्तरावर कार्यक्रम आयोजित करून पिकस्पर्धा बक्षीस वितरण करण्याचे नियोजित केले आहे. सदरच्या कार्यक्रमासाठी ------- एवढा निधी आवश्यक आहे. निधी मागणी तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | खर्चाची बाब | अपेक्षित खर्च रक्कम (रु.) | खर्चाचा सविस्तर तपशील |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| एकूण खर्च | | | |

तरी उपरोक्त तपशिलाप्रमाणे बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी रक्कम रु.--------एवढा निधी उपलब्ध करून द्यावा हि विनंती.

सही

**जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी----**

**प्रपत्र- ब**

**(तृणधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकस्पर्धा) (सर्वसाधारण गट / आदिवासी गट)**

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, खरीप- पिकस्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या खालील शेतक-यांची प्रपत्र अ, ब-१, ब-२ मधील माहीती बिनचुक व परिपुर्ण आहे. तसेच मार्गदर्शक सूचना मुद्दा क्र.९ नुसार पीक कापणी प्रयोगासाठी केलेली प्लॉटची निवड व मोजमापे योग्य आहे. सदर शेतक-यांच्या पीक कापणी प्लॉटची आलेल्या उत्पादकतेबाबत संबंधित पीक कापणी समिती व संबंधित शेतकरी यांचेशी स्वतः चर्चा करुन आलेल्या उत्पादकतेची शहानिशा आणि प्रपत्र ब-२ मधील ताळेबंदाची खातरजमा स्वतः केलेली आहे.

| अ.क्र. | शेतक-याचे नाव | पिक | पीक स्पर्धेसाठीचे क्षेत्र | क्षेत्राचे करावयाचे भाग (पिक कापणी प्लॉटची संख्या) | पीक कापणी प्लॉटचे आलेले सरासरी उत्पादन (क्विं.) | हेक्टरमध्ये रुपांतरीत करून आलेले धान्याचे उत्पादन (क्विं./हे.) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |

स्वाक्षरी/-

उपविभागीय कृषि अधिकारी,----------

जि. ----------